जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १३८ दिनांक - २७/०२/२०२५**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## बूलेट सायलेन्सरचा फटाका वाजवून नागरीकांना त्रास देणा-या वाहनचालकांच्या विरोधात कोंढवा पोलीसांची धडाकेबाज कारवाई.

दि.०१/०३/२०२५ रोजी पासून सुरू होणा-या रमजान महिन्याच्या अनुषंगाने कोंढवा पोलीसां कडून कोंढवा परिसरात दि.२८/०२/२०२५ रोजी बूलेट दुचाकी गाडीचा सायलेन्सर मॉडीफाईड करून फटाका वाजवून आजुबाजुच्या परिसरात राहणा-या जेष्ठ नागरीकांना, आजारी नागरीकांना तसेच १० वी १२ वी च्या विद्यार्थांना त्रास देणा-या वाहनचालकांच्या विरोधात विशेष मोहिम हाती घेण्यात आली होती. सदर मोहिमेदरम्यान कोंढवा पोलीसांनी अशा प्रकारच्या एकुण २० बुलेट दुचाकी गाड्यांवर कारवाई करून सदर गाड्यांचे मॉडीफाईड सायलेन्सर काढून ते पुणे मनपाच्या रोड-रोलरच्या सहाय्याने नष्ट करण्यात आलेले आहेत.

सदरची विशेष मोहिम हि मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-५,पुणे डॉ.राजकुमार शिंदे, मा. सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग,पुणे श्री.धन्यकुमार गोडसे,कोंढवा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनय पाटणकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.राऊफ शेख,यांच्या मार्गदर्शनाखाली कोंढवा पोलीस स्टेशन येथील अधिकारी व अंमलदार यांनी केली.




R.NO 60